# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

## मंगळवार, दिनांक ०४ मार्च, २०२५/ फाल्गुन १३, १९४६ (शके)

१९. महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०२ (३) अन्वये मंगळवार, दिनांक ०४ मार्च, २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता **श्रीमती पुष्पा दळवी, अवर सचिव यांचे दालन क्रमांक १४०४-ड, चौदावा मजला, विधान भवन, मुंबई** येथे संगणकीय आज्ञावलीद्वारे अशासकीय ठरावांचा प्राथम्यक्रम काढण्यात आला आहे. निदेशानुसार सदरहु ठराव **शुक्रवार, दिनांक ०७ मार्च, २०२५ रोजी** खालीलप्रमाणे चर्चेला घेण्यात येणार आहेत :-

**( मंगळवार, दिनांक ०४ मार्च, २०२५ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत )**

(१) **श्री.सुधाकर अडबाले, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ५२**

"राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भूकंप वगैरे नैसर्गिक संकटाना तोंड देण्यासाठी व बाधित नागरीकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपद्ग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १**

"शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशक यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(3) **डॉ.परिणय फुके, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ८७**

"राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनांचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्यामुळे विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे प्रलंबित काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**कृ.मा.प.**

(४) **श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६**

"राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळांडूचे देशी खेळांकडे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरु व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५) **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ३८**

"राज्यात मुंबईसह इतर शहरांतील सदनिकांच्या किंमतीमध्ये सातत्याने होत असलेली प्रचंड वाढ, सदनिकांच्या किंमतीत मूळ किंमतीपेक्षा कितीतरी अधिक पटीने होत असलेल्या वाढीमुळे शहरात सदनिका विकत घेणाऱ्या राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या स्वप्नपूर्तीत निर्माण होत असलेला अडसर, त्यामुळे सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करून स्थिर ठेवण्याबाबत सर्वसामान्य जनतेकडून होत असलेली आग्रही मागणी, तदनुषंगाने सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्याकरिता राज्य शासनाने तातडीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ४ मार्च, २०२५

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

**याची प्रत :-**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य
२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
५) सचिव (१)(कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) सचिव (२)(कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
८) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
१०) संगणक कक्ष (संकेतस्थळ)
११) एम.के.सी.एल.कक्ष (आज्ञावली)